आर. सी. पटेल, कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात ,

भूगोल दिवस साजरा २०२२




आर सी पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भूगोल दिवस, आदरणीय प्राचार्य डॉक्टर डी. आर. पाटील सर, व उपप्राचार्य डॉ. ए.एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉक्टर पी. वाय. मगरे, मार्गदर्शन यांनी करतांना, ग्रीष्मानंतर, वर्षा,शरद, हेमंत,शिशिर, वसंत क्रमाने येणाऱ्या ऋतूंची माहिती दिली व सूर्याचे उत्तरायण व दक्षिणायन कसे सपूर्ण जगाच्या मानवी संस्कृतीवर प्रभाव टाकतात हे पटवून सांगिले .जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासून मोसमी पाऊस तयार होण्याची प्रक्रिया सुरु होते, तो आपल्या पर्यंत यायला ४ $^{1}/_{2}$ ते ५ महिने बाकी आहे, तरी तो चांगला यावा यासाठी निसर्गाशी गोड संवाद करावा हे निमित साधून मकरसंक्रांतिचा सण साजरा केला जातो. या काळात सूर्य दक्षिणेला मकरवृत्तावर असतो. १४ जानेवारी च्या दरम्यान या पट्ट्यात सूर्याचे लंबरूप सूर्य किरणे पडतात. मकरवृत्ता दरम्यान प्रशांत ,हिंदी व अटलांटिक, महासागरांचा खुप मोठा भाग येत असल्याने, मकरवृत्ताच्या पट्यात ८० दिवस तापणारा सूर्य प्रचंड प्रमाणात समुद्र जलाचे बाष्पीभवन घडवून आणतो व त्यामुळेच वातावरणाला बाष्प पुरविले जावून ढगांची निर्निती होते. हेच ढग मान्सूनच्या रूपाने जसजसा सूर्य उत्तरेकडे

सरकतो तसतसे विषुववृत्ताकडे  सूर्याच्या पाठीमागून उत्तरेकडे सरकतात. पण हे ढग इकडे यायला आणखी पाच महिने अवधी असतो. यालाच  उत्तरायण म्हणतात. त्याचा फायदा मोसमी हवामानाच्या प्रदेशाला कसा होतो हे स्लाईड शोच्या माध्य्मातून पटवून दिले.आणि २१ जून व २१  डिसेंबर(आयनदिन) ते २१  मार्च व  २१  सप्टेंबर (विषुवदिन ) या तारखा चे महत्व पटवून सांगीतले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान उपप्राचार्य डॉक्टर आर.डी जाधवसर यांनी भूषविले,  तसेच यावेळी  भूगोल विभागातील ,जेष्ठ प्राध्यापक डॉ.बी.डी. पाटील, कला शाखेतील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी हजर होते.